प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

ऑक्टोबर 24, 2017

**येस बँक लि. ह्यांचेवर आरबीआयकडून आर्थिक दंड लागु**

ऑक्टोबर 23, 2017 रोजी भारतीय रिझर्व बँकेने (आरबीआय), येस बँक लि. ह्यांना, इनकम रेकग्निशन अॅसेट क्लासिफिकेशन (आयआरएसी) नॉर्म्स ह्यावरील आरबीआयने दिलेल्या निदेशांचे अनुपालन न करणे, आणि वरील बँकेच्या एटीएम्सबाबत, सिक्युरिटी इन्सिडेटाची माहिती उशिरा कळविणे ह्यासाठी, रु.60 दशलक्ष आर्थिक दंड लागु केला आहे. आरबीआयने दिलेल्या काही निदेशांचे अनुपालन न केल्याचे विचारात घेऊन, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 46(4)(1) सह वाचित कलम 47अ(1)(सी) ने दिलेल्या अधिकारांचा वापर करुन आरबीआयने हा दंड लागु केला आहे.

विनियामक बाबींचे अनुपालन न केल्यानेच ही कारवाई करण्यात आली असून, त्याचा संबंध ग्राहकांशी केलेले व्यवहार किंवा करारांच्या वैधतेशी नाही.

**पार्श्वभूमी**

मार्च 31, 2016 रोजीच्या वित्तीय स्थिती संबंधाने वरील बँकेच्या वैधानिक तपासणीमध्ये, इतर बाबींबरोबर, अकार्यकारी अॅसेट्स (एनपीएएस) च्या मूल्यमापनाबाबत, आरबीआयने दिलेल्या निरनिराळ्या विनियमांचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले.  एटीएमबाबतचा एक सायबर-सुरक्षा-प्रसंगही, विहित केलेल्या कालावधीत आला नव्हता. ह्या तपासणी अहवालावर व इतर संबंधित कागदपत्रांवर आधारित जुलै 6, 2017 रोजी व त्यानंतर ऑगस्ट 24, 2017 रोजी, आरबीआयने दिलेल्या निदेशांचे पालन न केल्या कारणाने आर्थिक दंड का लावला जाऊ नये अशी कारणे दाखवा नोटिस वरील बँकेला पाठविण्यात आली होती. ह्यावर वरील बँकेने दिलेली उत्तरे व वैय्यक्तिक सुनावणीमध्ये केलेले मौखिक सादरीकरण तसेच सादर केलेली अतिरिक्त माहिती व कागदपत्र विचारात घेऊन आरबीआयने निष्कर्ष काढला की, आरबीआयने दिलेल्या निदेशांचे अनुपालन न केल्याबाबतचे दावे खरे असून त्यासाठी आर्थिक दंड लावणे आवश्यक आहे.

**जोस जे कत्तूर**
मुख्य महाव्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/1116**